पुण्य नगरी
गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे : डॉ. मधुकर बाचूळकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वसुंधरेच्या रक्षणासाठी आपल्याकडे थोडाच अवधी राहिला आहे. आपण वेळीच सावध झाले पाहिजे. युवकांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय व्हावे, असे अवाहन पर्यावरणतज्ज्ञ डॉ. मधुकर बाचूळकर यांनी केले. विवेकानंद कॉलेजच्या भूगोल विभागाच्या वतीने जागतिक ओझोन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

डॉ. बाचूळकर म्हणाले, जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग यांनी २१०० मध्ये पृथ्वी मानवी वस्तीयोग्य राहणार नाही. मानवाने दुसऱ्या मानवी वस्तीयोग्य ग्रहाचा शोध घ्यावा, असे भाकित केले आहे. त्याची प्रचिती आपल्याला पावलोपावली येत आहे.

जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात जैवविविधतेचा ऱ्हास होताना उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. जागतिक तापमानवाढ आणि बदलते हवामान याचे गंभीर परिणाम आपण अनुभवतो आहोत. अंटार्क्टिका खंडावरील मोठ्या प्रमाणावर बर्फ वितळले असून, किनाऱ्यावरील देश जलमय होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ढगफुटी, अवकाळी पाऊस, भूस्खलन, महापुराच्या पाण्याने गावेच्या गावे वेढली जात आहेत. भूस्खलनामध्येही अनेक गावे गाडली गेली आहेत. प्रास्ताविक डॉ. एच. पी. पाटील यांनी केले. आभार डॉ. जी. एस. उबाळे यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय प्रा. व्ही. एम. पाटील यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. निशा सुर्वे यांनी केले. यावेळी डॉ. वैशाली पालकर, प्रा. अश्विनी मुरावणे यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

पुण्य नगरी | गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# 'विवेकानंद'मध्ये भित्तीपत्रक प्रदर्शन

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेज (अधिकार प्रदत्त स्वायत्त) येथील वनस्पतीशास्त्र विभाग आणि अंतर्रंगी गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय ओझोन दिनाचे औचित्य साधून भित्तीपत्रक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. यामध्ये 'ओझोन संवर्धन : पर्यावरण संरक्षणाची गरज' या संकल्पनेवर आधारित भित्तीपत्रके सादर केली. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. परशुराम तेली (प्राणीशास्त्र विभाग, पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, सांगली) यांच्या हस्ते करण्यात आले. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. कार्यक्रम आयोजनासाठी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत संवाद गुरुवार, १८ सप्टेंबर २०२५

# विवेकानंदमध्ये इलेक्ट्रॉनिक्स् विभागातर्फे सेमिनार

कोल्हापूर : अभियांत्रिकी दिनानिमित विवेकानंद कॉलेजमध्ये सिनिअर इलेक्ट्रॉनिक्स विभाग व बी.एस्सी.कॉम्प्युटर सायन्स एंटायर विभागातर्फे युगात एम्बेडेड सिस्टम डिझाईन या विषयावर सेमीनार झाले. डॉ. एस. ए. शिंदे, सहयोगी प्राध्यापक, इलेक्ट्रॉनिक्स् विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर होते तर विशेष वक्ते म्हणून श्री राहूल हिवरे , इंडस्ट्रियल आय.ओ.टी. कौन्सिलर, पुणे हे उपस्थित होते. या युगात एम्बेडेड सिस्टमची गरज व भविष्यातील संधी यावर विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. इलेक्ट्रॉनिक्स् विभागप्रमुख डॉ. सी. बी. पाटील यानी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. पी. आर. बागडे यांनी केली. सुत्रसंचालन डॉ. पी. एस. जाधव यांनी केले. प्रा. जी. बी. जिरगे यानी आभार मानले. यावेळी इलेक्ट्रॉनिक्स् विभागातील प्रा. आर. ए. देशमुख, आदी उपस्थित होते.




हॅलो प्रभात

# 'विवेकानंद' मध्ये आर.जी.चौगुले यांचा सेवानिवृत्ती समारंभ

कोल्हापूर : हॅलो प्रभात दि. 18/9/25

आपण संस्थेचे आहोत, संस्थेने आपल्याला दिलेले काम प्रामाणिकपणे पार पाडा, तरच असा सन्मान मिळतो, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार यांनी केले. ते आर.जी.चौगुले यांच्या सेवानिवृत्ती सदिच्छा समारंभात बोलत होते. श्री.चौगुले यांनी तब्बल ३४ वर्षे महाविद्यालयात प्रामाणिक व एकनिष्ठ सेवा बजावली. त्यांच्या कार्यनिष्ठेचा गौरव करण्यासाठी महाविद्यालय व संस्थेकडून सपत्नीक शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सत्काराला उतर देताना श्री. चौगुले यांनी कृतज्ञतेने मनोगत व्यक्त केले आणि संस्थेने दिलेल्या संधीबद्दल आभार मानले. कार्यक्रमाची सुरुवात संस्था प्रार्थनेने झाली.